# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल केलेले द्वितीय अपिल क्र.रामाआ नाशिक/द्वितीय अपिल क्र.२४६/२०२०/नाशिक मधील शास्तीचे प्रकरण**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री.संजय कारभारी कुटे,<br>रा.कुटे मळा, मु.पो.बेलतगव्हाण,<br>ता.जि.नाशिक. | निवासी नायब तहसिलदार,<br>तहसिल कार्यालय, नाशिक.<br>जिल्हाधिकारी कार्यालय आवार, नाशिक ता.जि.नाशिक. | तहसिलदार,<br>तहसिल कार्यालय, नाशिक.<br>जिल्हाधिकारी कार्यालय आवार, नाशिक ता.जि.नाशिक. |

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

**विवेचन**

उपरोक्त द्वितीय अपिलातील दि.१६/०८/२०१९ रोजीच्या माहिती अर्जान्वये अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

संजय कारभारी कुटे यांनी दि.२५/०७/२०१९ रोजी तहसिलदार साहेब यांच्या कार्यालयात अर्ज दिला होता व त्या अर्जाची दखल घेऊन तहसिलदार साहेबांनी पत्र क्र.आस्था-२/कावि/२३०/नाशिक दि.०९/०८/२०१९ अर्जदार यांना पत्र दिले व हया पत्रावर दि.१४/०८/२०१९ रोजी सुनावणी ठेवण्यात आली व अर्जदार व कामगार तलाठी रमेश रघुनाथ कागदे हे हजर होते. व दि.२५/०७/२०१९ च्या अर्जावर तहसिलदार साहेबांनी काय निकाल दिला त्याची लेखी स्वरुपात माहिती मिळावी व त्या निकालाच्या सत्य झेरॉक्स प्रती मिळाव्या व अर्जदार यांनी व तलाठी यांनी स्वाक्षरी केलेल्या कागदपत्रांच्या सत्य झेरॉक्स प्रती मिळाव्या. वरीलप्रमाणे सत्य माहिती सही, शिक्के, दिनांक टाकून निशाणी मारुन मिळावी.

२. सदर द्वितीय अपिलामध्ये आयोगाने दि.१३/१२/२०२१ रोजी सुनावणी घेवून खालीलप्रमाणे आदेश पारित केले होते.

"तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, नाशिक श्री.परमेश्वर कासुळे यांनी अपिलार्थी यांच्या दि.१६/०८/२०१९ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहित मुदतीत तसेच प्रथम अपिलाच्या निर्णयानंतरही माहिती पुरविली नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(१) चे उल्लंघन केले आहे. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा आदेश प्राप्तीच्या ७ दिवसांचे आंत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी."

३. आयोगाच्या उपरोक्त आदेशानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, नाशिक श्री.परमेश्वर कासुळे यांनी आयोगाकडे दि.३०/०३/२०२२ अन्वये लेखी खुलासा सादर केला असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की, सप्टेंबर २०१९ मधील विधानसभा निवडणुकीच्या कामकाजाकरिता माझी बदली विधानसभा मतदार संघ १२५ येथे करण्यात आलेली होती. सदरील कार्यालयाचा अतिरिक्त कार्यभार माझेकडेस होता. सदर विधानसभा निवडणूक कामकाज मुदतीत करण्याच्या नियोजनादरम्यान अपिलार्थी श्री.संजय कारभारी कुटे यांचे दि.१६/०८/२०१९ चे माहितीच्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती वेळेत पुरविणे शक्य झाले नाही. परंतू आज रोजी अर्जदार

यांना विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी हवी असलेली माहिती पुरविलेली आहे. तरी सदरचा खुलासा मान्य करुन कोणतीही कार्यवाही करु नये ही विनंती.

४. अपिलार्थी यांच्या दि.१६/०८/२०१९ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, नाशिक श्री.परमेश्वर कासुळे यांनी कोणतीही माहिती /उत्तर अपिलार्थी यांना दिल्याचे दिसून येत नाही. तसेच अपिलार्थी यांनी दि.१७/०९/२०१९ रोजी दाखल केलेल्या प्रथम अपिलाच्या अनुषंगाने देखील प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, नाशिक श्री.परमेश्वर कासुळे यांनी कोणतीही माहिती /उत्तर अपिलार्थी यांना दिल्याचे दिसून येत नाही. याव्यतिरिक्त तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, नाशिक श्री.परमेश्वर कासुळे यांनी आयोगास दिलेल्या खुलाशात असे नमूद केले आहे की, सप्टेंबर २०१९ मधील विधानसभा निवडणुकीच्या कामकाजाकरिता माझी बदली विधानसभा मतदार संघ १२५ येथे करण्यात आलेली होती. सदरील कार्यालयाचा अतिरिक्त कार्यभार माझेकडेस होता. परंतू याबाबतची कोणतीही कागदपत्रे / पुरावे त्यांनी खुलाशासोबत आयोगाकडे सादर केल्याचे दिसून येत नाही. यावरुन त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कोणतेही गांभीर्य नसल्याचे स्पष्ट होते. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, नाशिक श्री.परमेश्वर कासुळे यांनी आयोगाकडे सादर केलेला खुलासा समर्थनीय नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये शास्तीची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, नाशिक श्री.परमेश्वर कासुळे यांच्याविरुध्द आयोगाच्या मते उपरोक्त विवेचनाच्या पार्श्वभूमीवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २०(१) अन्वये रु.१५,०००/- (अक्षरी रुपये पंधरा हजार मात्र) शास्तीची कार्यवाही करण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम जिल्हाधिकारी, नाशिक यांनी त्यांच्या वेतनातून समान २ मासिक हप्त्यांत कपात करुन सदर रकमेचा भरणा **"००७०, इतर प्रशासनिक सेवा, (०१) (१८) माहितीचा अधिकार दंड व शुल्क (००७०-०७८९)"** या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही करावी व सदर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर त्याबाबत आयोगास अवगत करावे.

२) प्रस्तुत द्वितीय अपिल क्र.२४६/२०२०/नाशिक अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

( भूपेन्द्र गुरव )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

स्थळ :- नाशिक
दिनांक :-

---

प्रत :- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक ता.जि.नाशिक.

---

जावक क्र. २०७८ दिनांक :- 23 MAR 2026